# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २७०, २७१, ३०७–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. धन आयुर्वेद अ‍ॅग्रो अ‍ॅग्रीकल्चरल्स , ( केस क्र. २७०/१०)<br>(प्रोप्रा. श्री. धनंजयराव दादासो परदेशी) मु.पो. वाघवाडी,<br>ता. वाळवा, जि. सांगली.<br>२) श्री. आनंदराव सिदु डबाने, ( केस क्र. २७१/१०)<br>मु.पो. कासेगांव, ता. वाळवा, जि. सांगली.<br>३) श्री. सुर्या बायो फ्युएल, ( केस क्र. ३०७/१०)<br>पेठ, ता. वाळवा, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, इस्लामपूर, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय २, इस्लामपूर, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल )
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## संयुक्त न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

या तिन्ही तक्रार प्रकरणांची सुनावणी एकाचवेळी झाली आहे, त्यातील मागणी एकच असून वि.प.चा बचावही सारखाच आहे. ग्राहक प्रतिनिधी श्री. हरिभाऊ दि. खापरे यांनी मंचाकडे अनुसूची ‘अ‘ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ६.१० नुसार वितरण कंपनीविरुध्द तक्रारी दाखल केल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

I ) <u>श्री. धन आयुर्वेद अॅग्रो अॅग्रीकल्चरल्स , ( केस क्र. २७०/१०)</u>

श्री. धन आयुर्वेद अॅग्रो अॅग्रीकल्चरल्स, मु.पो. वाघवाडी, ता. वाळवा, जि. सांगली यांनी ग्राहक प्रतिनिधी श्री. हरिभाऊ दि. खापरे यांनी मंचाकडे दि. १४.१०.२०१० रोली अनुसूची 'अ' मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ६.१० नुसार वितरण कंपनीविरुध्द तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

श्री. धन आयुर्वेद अॅग्रो अॅग्रीकल्चरल्स यांना व्यापारी कारणासाठी गट क्र. २१४ वाघवाडी येथे एसई/एससी/डीएस/३६/०७–०८ दि. ७.९.२००७ नुसार ४० एच.पी. विद्युत पुरवठा वि.प.ने मंजूर केलेला आहे. त्याच्या मंजुरीचे अंदाजपत्रक रु. ४,९१,११०/– एवढ्या रकमेचे आहे. यासाठी भरावे लागणारे चलन रु. ३०,९५५/– हे पावती क्र. ०२८९६३६ दि. १०.१०.२००७ नुसार भरलेले आहे. अर्जदाराने वीज पुरवठ्यासाठी लागणारे एल.टी. रोहित्र व एच.टी. वाहिनी वितरण कंपनीच्या मान्यताप्राप्त कंत्राटदाराकडून कंपनीच्या देखरेखीखाली करुन घेतलेले आहे. ग्राहकास हा वीज पुरवठा वि.प.ने दि. १.२.२००८ रोजी दिलेला असून त्याचा ग्राहक क्र. २८४६७०४०१२२५ आहे. मंजुरी वीज पुरवठा देतांना वि.प.ने आपले परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ चा उल्लेख केलेला आहे. त्यामध्ये डी.डी. एफ. योजना कशा रितीने राबवायची हे स्पष्ट केलेले आहे. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार वि.प.च्या इस्लामपूर विभागीय कार्यालयाने त्यांना वीज पुरवठा करतांना या परिपत्रकाच्या अधिन न राहता वीज पुरवठा केलेला आहे. सदर वीज पुरवठा मा. आयोगाच्या शेड्यूल ऑफ चार्जेसच्या विपरीत आहे. तसेच हा वीज पुरवठा मा. राज्य आयोगाच्या दि. १६.२.२००८ च्या केस क्र. ५६/२००७ मधील आदेशातील डी.डी.एफ. निर्देशांचे पालन न करता केलेला आहे. तसेच हा वीज पुरवठा विद्युत पुरवठ्याची संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ मधील २ (जी) या व्याख्येनुसार नाही. अर्जदाराने आपल्या तक्रारीत मा. आयोगाच्या केस क्र. ५६/२००७ मधील आदेशाचा संदर्भ देवून वि.प.कडून डी.डी.एफ. योजना कशी चुकीच्या पध्दतीने राबविण्यात येते हे सांगितले. तसेच तक्रारीतील पॅरा. ५ मध्ये वि.प.चे परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ चा उल्लेख केला आहे. आपल्या म्हणण्या पुष्ट्यर्थ मा. आयोगाची केस क्र. ७०/२००५ दि. ८.९.२००६, केस क्र.५६/२००७ दि. १६.२.२००८, केस क्र. ३६/२००९ दि. १९.१२.२००९ आणि केस क्र. ९३/२००८ दि. १.९.२०१० चे आदेश जोडले आहेत.

ग्राहकाने सुरुवातीला अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र. ४३८ दि. २४.८.२०१० दाखल केली. अंतर्गत कक्षाचे १.१०.२०१० ला आदेश झाले. त्यामध्ये एम.इ.आर.सी. आदेशचा अभ्यास करुन व डी.डी.एफ. परिपत्रकाचा अभ्यास करुन नियमाप्रमाणे डी.डी.एफ. ची रक्कम परत करण्याची कार्यवाही करावी असे आदेश दिले आहेत. मंचाकडून अपेक्षित मदत – वि.प.कडून मिळणारी रक्कम प्रथम दोन बिलींग सायकलमध्ये मिळावी व जर ही रक्कम दोन बिलींग सायकलमध्ये समायोजित होत नसेल तर मा. आयोगाच्या केस क्र. ३६/२००९ मधील संदर्भ विचारात घेवून उर्वरीत रक्कम रोख व व्याजासह परत मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. २१.१२.२०१० च्या सदस्य सचिव यांना अग्रेषित केलेल्या लेखी अहवालात ग्राहकाने प्रत्यक्ष वापरलेले साहित्याचे मुल्यांकन करणेची कार्यवाही सुरु असून सदर रक्कम म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित चे परिपत्रकानुसार ग्राहकाचे प्रत्येक वीज देयकातून ५०% समायोजन करणेची कार्यवाही लवकरच प्राधान्याने करणेत येत आहे असे म्हटले आहे.

II ) श्री. आनंदराव सिदु डबाने, ( केस क्र. २७१/१०)

श्री. आनंदराव सिदु डबाने, कासेगांव यांनी आपले प्रतिनिधी श्री. हरिभाऊ दि. खापरे यांच्यामार्फत मंचाकडे दि. १४.१०.२०१० रोजी अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ६.१० नुसार वितरण कंपनीविरुध्द तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

अर्जदाराने आपली शेती गट क्र. २७३७ कासेगांव येथे १८ एच.पी. औंद्योगिक कारणासाठी एसई/एससी/डीएस/३६/०७–०८ दि. ७.९.२००७ नुसार १८ एच.पी. विद्युत पुरवठा वि.प.ने मंजूर केलेला आहे. त्याच्या मंजुरीचे अंदाजपत्रक रु. २,४७,७२०/– एवढ्या रकमेचे आहे. यासाठी भरावे लागणारे चलन रु. १८,१३५/– हे पावती क्र. ६१९१२८२ दि. ८.७.२००८ नुसार भरलेले आहे. अर्जदाराने वीज पुरवठ्यासाठी लागणारे एल.टी. रोहित्र व एच.टी. वाहिनी वितरण कंपनीच्या मान्यताप्राप्त कंत्राटदाराकडून कंपनीच्या देखरेखीखाली करुन घेतलेले आहे. ग्राहकास हा वीज पुरवठा वि.प.ने दि. ८.८.२००८ रोजी दिलेला असून त्याचा ग्राहक क्र. २८४०७०१४३४ आहे. मंजुरी वीज पुरवठा देतांना वि.प.ने आपले परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ चा उल्लेख केलेला आहे. त्यामध्ये डी.डी. एफ. योजना कशा रितीने राबवायची हे स्पष्ट केलेले आहे. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार वि.प.च्या इस्लामपूर विभागीय कार्यालयाने त्यांना वीज पुरवठा करतांना या परिपत्रकाच्या अधिन न राहता वीज पुरवठा केलेला आहे. सदर वीज पुरवठा मा. आयोगाच्या शेड्यूल ऑफ चार्जेसच्या विपरीत आहे. तसेच हा वीज पुरवठा मा. राज्य आयोगाच्या दि. १६.२.२००८ च्या केस क्र. ५६/२००७ मधील आदेशातील डी.डी.एफ. निर्देशांचे पालन न करता केलेला आहे. तसेच हा वीज पुरवठा विद्युत पुरवठ्याची संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ मधील २ (जी) या व्याख्येनुसार नाही. अर्जदाराने आपल्या तक्रारीत मा. आयोगाच्या केस क्र. ५६/२००७ मधील आदेशाचा संदर्भ देवून वि.प.कडून डी.डी.एफ. योजना कशी चुकीच्या पध्दतीने राबविण्यात येते हे सांगितले. तसेच तक्रारीतील पॅरा. ५ मध्ये वि.प.चे परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ चा हवाला दिला आहे. सुरुवातीला ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष. सांगली येथे तक्रार क्र. ४३७ दि. २४.८.२०१० ला दाखल केली. अंतर्गत कक्षाचे आदेश १.१०.२०१० झाले. त्यामध्ये असे निरीक्षण केले आहे की, एम.इ.आर.सी. आदेशचा अभ्यास करुन व डी.डी.एफ. परिपत्रकाचा अभ्यास करुन नियमाप्रमाणे डी.डी.एफ. ची रक्कम परत करण्याची कार्यवाही करावी. ग्राहकाने अंदाजपत्रकीय रक्कम रोख मिळावी अशी मागणी केली आहे त्यासाठी मा. आयोगाच्या आदेशाचा संदर्भ घेतला आहे. तसेच चलन भरलेल्या दिनांकापासून रक्कम मिळेपर्यंतच्या कालावधीसाठी विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६२(६) नुसार व्याज मिळावे अशी मागणी केली आहे. शेवटी पॅरा ४ मध्ये मा. विद्युत नियामक आयोगाचे दि. १.९.२०१० चे केस क्र. ९३/२००८ मधील आदेशाचा संदर्भ घेतला आहे. तसेच पॅरा ५ मध्ये वि.प.कडून मिळणारी रक्कम प्रथम दोन बिलींग सायकलमध्ये मिळावी व जर ही रक्कम दोन बिलींग सायकलमध्ये समायोजित होत नसले तर मा. आयोगाच्या केस क्र. ३६/२००९ मधील आदेशानुसार उर्वरित रक्कम रोख व्याजासह परत मिळावी अशी मागणी केली आहे. आपल्या अर्जासोबत कॉस्टींग ऑफ एस्टीमेट अंडर डी.डी.एफ. स्कीमचा ॲबस्ट्रॅक्ट, अंतर्गत कक्षाचा आदेश, दि. २५.६.२००८ चे डी.डी.एफ. मंजुरी पत्र, डी.डी.एफ. मध्ये दि. ८.७.२००८ ची चलन भरल्याची पावती, पत्र–व्यवहाराच्या झेरॉक्स प्रती, वीज पुरवठा मिळाल्याचे देयक, मा. आयोगाचे केस क्र. ३६/२००९ व केस क्र. ९३/२००८ मधील आदेश सोबत जोडले आहेत.

वि.प.चे कार्यकारी अभियंता, इस्लामपूर यांच्या दि. २.११.२०१० च्या पत्रात अधीक्षक अभियंता यांच्याकडून अंतर्गत कक्षाचे आदेशानुसार पत्र क्र. ७४८४ दि. ७.१०.२०१० नुसार मार्गदर्शन मागितले आहे ते प्राप्त झाल्यानंतर सदर डी.डी.एफ. ची रक्कम परत करण्याबाबत कार्यवाही करणेत येईल असे म्हटले आहे.

III ) श्री. सुर्या बायो फ्युएल, ( केस क्र. ३०७/१०)

श्री. सुर्या बायो फ्युएल, पेठ, ता. वाळवा, जि. सांगली यांनी आपले प्रतिनिधी श्री. हरिभाऊ दि. खापरे यांच्यामार्फत मंचाकडे दि. ३.१२.२०१० रोजी अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ६.१० नुसार वितरण कंपनीविरुध्द तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

तक्रारदार हा वि.प.चा ग्राहक आहे. त्यांना गट क्र. २१६५ पेठ, ता. वाळवा येथे ६० एच.पी. इतका भार औंद्योगिक कारणासाठी वितरण कंपनीने मंजुरी पत्र क्र. एसई/एससी/डीएस/१४२/०७–०८ दि. ३१.०३.२००८ नुसार मंजूर केला. ग्राहकाने त्यासाठी भरावी लागणारी चलनाची रक्कम रु. ६९,३२७/– पावती क्र. ६१७९४८२ दि. ११.३.२००७ नुसार भरलेले आहेत. अर्जदाराने वीज पुरवठ्यासाठी लागणारे एल.टी. रोहित्र व एच.टी. वाहिनी वितरण कंपनीच्या मान्यताप्राप्त कंत्राटदाराकडून कंपनीच्या देखरेखीखाली करुन घेतलेले आहे. ग्राहकास हा वीज पुरवठा वि.प.ने दि. ५.४.२००८ रोजी दिलेला असून त्याचा ग्राहक क्र. २८४०२०४०१३३६ आहे. मंजुरी वीज पुरवठा देतांना वि.प.ने आपले परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ चा उल्लेख केलेला आहे. त्यामध्ये डी.डी. एफ. योजना कशा रितीने राबवायची हे स्पष्ट केलेले आहे. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार वि.प.च्या इस्लामपूर विभागीय कार्यालयाने त्यांना वीज पुरवठा करतांना या परिपत्रकाच्या अधिन न राहता वीज पुरवठा केलेला आहे. सदर वीज पुरवठा मा. आयोगाच्या शेड्यूल ऑफ चार्जेसच्या विपरीत आहे. तसेच हा वीज पुरवठा मा. राज्य आयोगाच्या दि. १६.२.२००८ च्या केस क्र. ५६/२००७ मधील आदेशातील डी.डी.एफ. निर्देशांचे पालन न करता केलेला आहे. तसेच हा वीज पुरवठा विद्युत पुरवठ्याची संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ मधील २ (जी) या व्याख्येनुसार नाही. ग्राहकाने आपल्या मागणी पुष्ट्यर्थ मा. आयोगाच्या केस क्र. ५६/२००७ मधील आदेशाचे समर्थन घेतले आहे.

ग्राहकाने यापूर्वी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष. सांगली येथे तक्रार क्र. ५१८ दि. १३.९.२०१० ला दाखल केली. अंतर्गत कक्षाचे आदेश २६.११.२०१० झाले. त्यामध्ये अधीक्षक अभियंता, मंडल कार्यालय, सांगली यांचे पत्र क्र. अअ/सांमं/तां/अंग्रातनिकक्ष/डी.डी.एफ./१२२८३ दि. १५.११.२०१० चक समर्थन घेतले आहे. ग्राहकाने मंचासमोर परतावा पार्ट पेमेंटच्या स्वरुपात न करता तो पूर्ण रकमेचा वीज बिलातून मिळावा अशी मागणी केली आहे. त्यासाठी मा. विद्युत नियामक आयोगाचे दि. १.९.२०१० चे केस क्र. ९३/२००८ मधील आदेशाची मदत घेतली आहे व परताव्याच्या रकमेस विलंब होणार नाही हे तत्व विचारांत घेवन आदेश व्हावेत अशी मागणी केली आहे. तक्रारीसोबत अंतर्गत कक्षाचे दि. २६.११.२०१० चे आदेशाची प्रत जोडली आहे. रु. ६,९३,२७२/– भरल्याचे चलन व कोटेशनची कॉपी, मंजुरीपत्रक, एस्टीमेटची कॉपी व रु. १००/– चा स्टँप जोडला आहे.

वितरण कंपनीने नोटीस देवूनही दि. २३.१२.२०१० पर्यंत आपला लेखी अहवाल दिला नाही. वि.प.चा दि. १.१.२०११ चा लेखी अहवाल दि. ६.१.२०११ ला मंचात प्राप्त झाला. त्यामध्ये इन्फ्रास्टक्चरसाठी खर्च केलेली रक्कम परत करण्याचे आदेश यापूर्वीच प्राप्त झालेले असून त्या अनुषंगाने ग्राहकास रक्कम परत करण्यात येईल.

आपल्या मुख्य कार्यालयाचे परिपत्रक क्र. ३९२०६ दि. २१.१२.२००९ नुसार परतावा देण्यात येईल, अंदाजपत्रकानुसार रक्कम परत करणे संयुक्तिक होणार नाही. प्रत्यक्ष काम करीत असतांना तयार करण्यात येणाऱ्या इन्फ्रास्टक्चरमध्ये जागेच्या परिस्थितीनुसार कांही बदल होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे प्रत्यक्ष काम करीत असतांना होणार खर्च अंदाजपत्रकापेक्षा काही प्रमाणात कमी किंवा जास्त होवू शकतो. त्यानुसार प्रत्यक्ष वापरलेल्या साहित्याच्या अनुषंगाने रक्कम परत करणे योग्य व संयुक्तिक आहे. तसेच गाहकाने भरलेल्या १.३०% निर्देशांकित आकारसुध्दा परत करण्याची तयारी दर्शविली आहे. तसेच ग्राहकांना परत करावयाची रक्कम निश्चित करुन वीज देयकातून ५० टक्के रक्कम परतफेड पूर्ण होईपर्यंत समायोजित केली जाईल असे म्हटले आहे.

प्रस्तुतची तक्रार क्र. २७१/१० समवेत दि. २२.१२.२०१० ला सुनावणीस घेतली असता वि.प.चे कार्यकारी अभियंता व ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. दि. १२.१.२०११ ला वि.प.चे उप कार्यकारी अभियंता श्री. एस.के. नेगलूर उपस्थित. वि.प.चा या दोन्ही केसमध्ये बचाव एकसारखाच आहे. मुख्य कार्यालयाचे आदेशानुसार दि. २१.१२.२००९ चे परिपत्रक क्र. ३६२०६ नुसार परताव्याची रक्कम ५०% वीज बिलातून परत देण्यात येईल. वि.प.ने मुदत घेतल्यानंतर Audited expenditure चा हिशोब Amount to be refunded या सदराखाली रु. २,४८,८९७.३० असा दिला आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. २२.१२.२०१० व त्यानंतर दि. १२.१.२०११ ला सुनावणीस घेतली. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.चे अधिकारी उपस्थित. वि.प. तर्फे कार्यकारी अभियंता, इस्लामपूर यांनी श्री. आनंदराव सिधू डबाने याचे डी.डी.एफ. योजनेअंतर्गत प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या रकमांचा तपशील पत्र क्र. ६१८ दि. २५.१.२०११ नुसार पाठविला तो मंचामध्ये दि. २७.१.२०११ ला दाखल करण्यात आला. त्याची प्रत ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांना पाठविल्याचे दिसते. श्री. खापरे यांनी वि.प.च्या मुख्य कार्यालयाचे परिपत्रक क्र. ३९२०६ दि. ३१.१२.२००९ हे प्रॉस्पेक्टीव्ह कंझ्यूमर्ससाठी लागू असल्याचे प्रतिपादन केले. प्रस्तुतच्या तक्रारीचे काम दि. ८.८.२००८ ला पूर्ण होवून तक्रारदारास वीज जोडणी देण्यात आलेली आहे. अशा प्रकारे परतावा द्यावयाचा झाला तर सुरक्षा ठेव ५०% रक्कम परत देता येईल का ? असा प्रश्न उपस्थित आला. वि.प.चा अहवाल पहातां, डी.डी.एफ. ची रक्कम परत देण्याची तयारी दर्शविली आहे पण ५०% बिलातून देण्याबाबत परिपत्रकाचा हवाला घेतला आहे. या उलट, मा. आयोगाचा दि. १.९.२०१० चा केस क्र. ९३/२००८ मधील आदेशानुसार परताव्याची रक्कम वीज बिलातून देण्याचे आदेश आहेत त्यामध्ये वि.प.चे परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ चा उल्लेख आहे. वि.प.ने WCR प्रमाणे ग्राहकाने प्रत्यक्ष केलेला खर्च त्याचप्रमाणे मा. आयोगाच्या Schedule of Charges प्रमाणे १.३०% नॉर्मेटिव्ह चार्जेस बिलातून देण्याची तयारी दर्शविली आहे. त्याप्रमाणे लेखी म्हणणे सादर करण्यास त्यांना दि. ७.१.२०११ पर्यंत मुदत देण्यात आली, त्याप्रमाणे दि. ६.१.२०११ च्या पत्रानुसार म्हणणे दाखल केले. त्यामध्ये ग्राहकाच्या अंदाजपत्रकीय रक्कम मागणेस विरोध दर्शविला आहे. वि.प.च्या म्हणण्यानुसार प्रत्यक्ष काम करीत असतांना होणारा खर्च अंदाजपत्रकापेक्षा काही प्रमाणात कमी किंवा जास्त होवू शकतो. त्यानुसार प्रत्यक्ष वापरलेल्या साहित्याच्या अनुषंगाने रक्कम परत करणे योग्य व संयुक्तिक आहे. दि. २५.१.२०११ च्या पत्रासोबत मुख्य कार्यालयाचे परिपत्रक क्र. ३९२०६ दि. २९.१२.२००९ चा संदर्भ घेवून ५०% रक्कम समायोजित करण्यात यावी व उर्वरित रक्कम दर मासिक देयकाच्या ५०% अदा करावी लागेल. त्या सोबत ऑडीटेड रक्कम रु. १,६१,६००/- दाखविण्यात आली आहे.

प्रस्तुतची तक्रार दि. १२.१.२०११ ला सुनावणी घेतली असतां ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे उप कार्यकारी अभियंता श्री. एस.के. नेगलूर, सहाय्यक अभियंता श्री. एस.व्ही. बेडूसकर उपस्थित. वि.प.चे म्हणणे पहातां, परतावा देण्याची तयारी आहे फक्त देण्याची पध्दतीबद्दल वाद आहे, तेव्हा वेगळ्या पध्दतीने देण्याची तयारी दर्शविली. वि.प.चे दि. २१.१२.२००९ चे परिपत्रक हे प्रॉस्पेक्टीव्ह कंझ्यमर्ससाठी आहे, सध्याच्या ग्राहकास वि.प.कडे हिशोब मागण्याचा अधिकार नाही. इन्फ्रास्टक्वर प्रमाणे रक्कम परत दिली जाईल. मा. आयोगाची केस क्र. ९३/२००८ मधील दि. १.९.२०१० चे आदेश व परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ चा हवाला घेतला आहे, त्यामध्ये परतावा बिलातून द्यावा असे आदेश आहेत. ग्राहक प्रतिनिधींनी मा. आयोगाच्या केस क्र. ३६/२००९ मध्ये रक्कम रोख द्यावी असे आदेश आहेत असे प्रतिपादन केले. या उलट वि.प.चे अधिकारी श्री. नेगलूर यांनी मंचासमोर कंपनीची बाजू मांडतांना वितरण कंपनी कामाचे व्हॅल्यूएशन करु शकते, इन्फ्रास्टक्वरची रक्कम ग्राहकास परत देण्यात येईल, अंदाजपत्रक व प्रत्यक्ष काम यामध्ये कमी/ जास्त बदल होऊ शकतो असे म्हटले आहे. तसेच मुख्य कार्यालयाच्या परिपत्रकाप्रमाणे परतावा देण्याची तयारी आहे असे सांगितले. WCR प्रमाणे ग्राहकाने प्रत्यक्ष केलेला खर्च सादर करण्यास मुदत वि.प.ने मुदत मागितली त्यानुसार त्यांना मुदत देण्यात आली, त्याप्रमाणे वि.प.ने आपल्या दि. २५.१.२०११ च्या पत्र जे मंचात दि. २७.१.२०११ ला प्राप्त झाले, त्यानुसार माहिती सादर केली आहे. परिपत्रक क्र. ३९२०६ दि. २१.१२.२००९ प्रमाणे परतावा देण्यात येईल. सोबत हिशोबाचा तक्ता देवून त्यामध्ये परतावा देय रक्कम रु. ३,९७,१००/– दाखविली आहे. खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) या तिन्ही तक्रारीमध्ये ग्राहकाची अंदाजपत्रकीय रक्कम परतावा मागणी मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर : नाही वि.प.ने WCR प्रमाणे प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचे मुल्यांकन करुन मंचासमोर दाखल रकम परत देण्याचा आदेश देणेत येत आहे.

२) तक्रार क्र. २७० व २७१/१० मध्ये ग्राहकाने मागणी केल्यानुसार परताव्याची रक्कम दोन बिलींग सायकलमध्ये समायोजित करुन उर्वरित रक्कम रोखीने मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर : नाही

३) तक्रार क्र. ३०७/२०१० मध्ये ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे पार्ट पेमेंट न करता पूर्ण रकमेचा परतावा पूर्ण बील या स्वरुपात करावा ही मागणी योग्य व कायदेशीर होईल काय ?

उत्तर : नाही

४) काय आदेश ?

उत्तर : अंतिम आदेशा प्रमाणे.

कारणमिमांसा

या तिन्ही तक्रारीतील लेखी / तोंडी बचाव मंचासमोर एकत्रित पाहिले असतां, परताव्याची रक्कम परत देण्याची तयारी वि.प.ने दाखविली आहे. फक्त परताव्याची रक्कम कशा पध्दतीने द्यावयाची या बाबत ग्राहक व वितरण कंपनी यांची वेगवेगळी बाजू आहे. यापूर्वी डी.डी.एफ. योजना मा. विद्युत नियामक आयोगाचा केस क्र. ५६/२००७ मधील दि. १६.२.२००८ च्या आदेशानुसार व कंपनीचे दि. २०.५.२००८ चे परिपत्रक क्र. २२१९७ नुसार राबविली गेली नाही, हे विनियमाविरुध्द होते त्याबद्दल वि.प.ने वेगळा बचाव मांडला नाही.

आता प्रश्न राहतो तो ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे एस्टिमेटेड कॉस्ट प्रमाणे परतावा द्यावयाचा कि वितरण कंपनी म्हणते त्याप्रमाणे प्रत्यक्ष झालेला खर्चाचा परतावा द्यायचा जो वि.पच्या अधिकाऱ्यांनी तयार करुन २५.१.२०११ च्या पत्रासोबत सादर केला आहे. एस्टिमेटेड कॉस्ट अथवा इन्फ्रास्ट्रक्चर कॉस्ट व प्रत्यक्षात केलेला खर्च यामध्ये निश्चितपणे तफावर असू शकते हे मान्य करावे लागेल.

सुनावणी दरम्यान वि.प.च्या अधिकाऱ्यांनी WCR च्या रकमा देण्यास मुदत मागून घेतली. त्यानुसार केस क्र. २७०/२०१० मध्ये २५.१.२०११ च्या पत्रानुसार झालेल्या खर्चाचे मुल्यांकन करुन त्याची प्रत सोबत जोडली आहे. त्यानुसार रु. २,४८,८९७.३० ही एकत्रित परताव्याची रक्कम दाखविली आहे. त्यापूर्वी वि.प.ने cost of estimate under DDF Scheme, supervision charges @ 15% on erection charges (Item No. 2) Rs. 6,679.32 and 1.3% Normative Charges on service connection charges Rs.84.50 असे एकूण रु. ६,७६३.८२. Annexture A 4 अ.क्र. ७ वर C.T. operated meter unit - 1 Qty. Rs. 22,500/- दाखविली आहे. या कार्यालयाने ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांना या खर्चाच्या मुल्यांकनाची प्रत पाठविली आहे, परंतु आजपर्यंत त्याबद्दल लेखी म्हणणे दाखल केले नाही.

केस क्र. २७१/२०१० मध्ये ही रक्कम रु. १,६१,६००/- दाखविली आहे. त्याचीही प्रत ग्राहक प्रतिनिधींना पोष्टाने कार्यालयाकडून पाठविलेली आहे. Estimated cost under D.D.F, त्यामध्ये ग्राहकाकडूSupervision charges @ 1.3% Normative charges on service connection charges Rs. 32.50, Supervision charges @ 1.3 normative charges (Material + Labour ) for DDF Rs. 2231.37 घेतलेचे दिसत आहेत.

तसेच तक्रार क्र ३०७/२०१० मध्ये वि.पच्या अधिकाऱ्यांनी दि. २५.१.२०११ ला रु. ३,९७,१००/- अशी रक्कम ग्राहकास परतावा देण्यासाठी प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचे मुल्यांकन करुन दाखविली आहे. त्यामध्ये १,३% नॉर्मेटिव्ह चार्जेस रु. ९,१४२/- चा समावेश केला आहे. याची प्रत ग्राहक प्रतिनिधी यांना कार्यालयाकडून पाठविली आहे, परंतु आजपर्यंत म्हणणे दाखल केलेले नाही. Cost of esitmate under D.D.F. Scheme मंजुरी पत्रासोबत पाठविली त्यामध्ये metering equipment for connection Rs. 24323/- आहे. सबब वि.प.ने अपल्या लेखी अहवालात म्हटल्याप्रमाणे अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा प्रत्यक्ष कामाकरिता झालेला खर्च हा निश्चितपणे कमी आहे तो वि.प.च्या अधिकाऱ्यांनी ऑडीट केलेला आहे आणि त्यामध्ये तफावत असल्याने ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे संपूर्ण अंदाजपत्रकीय रकमेचा परतावा करण्याचे आदेश करणे हे कायद्याला धरुन होणार नाही. त्यामुळे वि.प.च्या म्हणण्यानुसार WCR प्रमाणे प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचे मुल्यांकनानुसार दाखल केल्याप्रमाणे रकमा ग्राहकास परत देण्याचे आदेश देणे योग्य होईल.

तक्रार क्र. २७०/१० व २७१/२०१० मध्ये ग्राहकाने परताव्याची रक्कम प्रथम दोन बिलींग सायकलमध्ये समायोजित करुन उर्वरित रक्कम एक रकमी परत देण्याचे आदेश व्हावेत अशी मागणी केली आहे. प्रथमदर्शनी परतावा रकमेचे बिलामध्ये समायोजन करावे अशी मागणी केली आहे. प्रत्यक्षात अधिनियमातील १२.२ च्या तरतुदीनुसार भरपाईची रक्कम परतावाही दोन बिलींग सायकलमध्ये परत करण्याचे आदेश करणे कायदेशीर होईल. या ठिकाणी ग्राहकास परतावा करण्यात आलेली रक्कम ही भरपाईची नसून मा. विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार वि.प.ने इन्फ्रास्टक्चर उभा करतांना ग्राहकाने खर्च केलेली रक्कम परत देण्याचे विद्युत कायदा २००३ मधील तरतुदीनुसार आदेश आहेत.

आता प्रश्न राहता तो की परताव्याची रक्कम कशी द्यावयाची ? या दोन्ही केसमध्ये परताव्याची रक्कम WCR प्रमाणे अनुक्रमे रु. २,४८,८९७/– व रु. १,६१,६००/– अशी आहे. ग्राहकाने आपल्या कनेक्शनचे मागील बील जोडले आहे. त्यामध्ये अनुक्रमे रु. १२,४१०/– व रु.२३,४००/– मासिक बील आकार आहे. वि.प.च्या म्हणण्यानुसार मासिक बिलात ५०% परतावा रक्कम समायोजित करण्यात यावी यासाठी मुख्य अभियंता (वाणिज्य) यांचे परिपत्रक क्र. ३९२०६ दि. २१.१२.२००९ चा संदर्भ घेतला आहे. परंतु हे परिपत्रक Prospective consumers साठी आहे असे म्हणावे लागल. या दोन्ही केसमधील वीज जोडणी ही दि. २१.१२.२००९ पूर्वी केली आहे व परिपत्रकातील उल्लेख

" To refund of such charges the Competent Authority i.e. Managing Director, MSEDCL has accorded approval to refund entire expenditure incurred by the prospective consumers for release of supply under Dedicated Distribution Facility ( even though the work is not dedicated ) by way of adjusting 50% of the monthly bill amount till clearance of the total expediture."

त्यामुळे वि.प. मुख्य अभियंत्यांच्या सदर परिपत्रकाचा फायदा घेवू शकत नाही. ग्राहक प्रतिनिधींनी आपल्या तक्रारीसोबत मा. आयोगाची केस क्र. ९३/२००८ मधील दि. १.९.२०१० च्या आदेशातील पान क्र. १२

III व पॅरा १९ मध्ये निरीक्षण केल्याप्रमाणे –

Thereafter MSEDCL should adjust the extra charges collected by MSEDCL in the energy bills of the respective consumers.

त्याच पॅरामध्ये निरीक्षण केल्याप्रमाणे

MSEDCL either has to scrutinise details of all the consumers released during the period of 9th Sept. 2006 to 20th May 2008 for charges levied other than approved Schedule of Charges.

केस क्र. २७०/२०१० मधील ग्राहकास विद्युत पुरवठा दि. १.२.२००८ रोजी दिला आहे व केस क्र. २७१/२०१० मध्ये कोटेशन दि. ८.८.२००८ रोजी भरले आहे व त्यांना विद्युत पुरवठा दि. ८.८.२००८ रोजी दिला आहे. मा. आयोगाचे दि. १.९.२०१० चे केस क्र. ९३/२००८ मधील आदेश पहांता, परताव्याची रक्कम वि.प.ने ग्राहकाच्या वीज बिलामध्ये समायोजित करण्याची आहे. त्या केसमध्ये ग्राहकाने पॅरा २ मधील अ.क्र. ५ वर –

ORC Amount, meter cost and other chages collected or DDF amount, earlier to 20.5.2008 till 08.09.2006 , may be refunded by way of energy bills as per the procedure adopted for cases following Circular No. 22197 dated 20.05.2008.

अशी मागणी केलेली आहे. प्रस्तुतचे परिपत्रक हे मा. आयोगाचे दि. १६.२.२००८ चे केस क्र. ५६/२००७ मधील आदेशानुसार आहे. त्यामुळे ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे परताव्याची रक्कम दोन बिलींग सायकलमध्ये समायोजित करुन उर्वरित रक्कम रोखीने द्यावी ही मागणी फेटाळणेत येत आहे. मुद्दा क्र. २ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

तक्रार केस क्र. ३०७/२०१० मध्ये ग्राहकाने क्र. ४ वर विनंती केली आहे की, मा. राज्य विद्युत नियामक आयोगाच्या केस क्र. ९३/२००८ दि. १.९.२०१० प्रमाणे वितरण कंपनीने पालन करावे. या आदेशात मा. आयोगाने निर्देश दिले आहेत की,

Thereafter MSEDCL should adjust the extra charges collected by MSEDCL in the energy bills of the respective consumers.

पुढे हा परतावा वितरण कंपनीने एखाद्या परिपत्रकाप्रमाणे न करता मा. आयोगाच्या वरील आदेशास अधीन राहून करावा अशी विनंती केली आहे. तसेच मा. आयोगाने परतावा देतांना विलंब होणार नाही हे तत्व केस क्र. ३६/२००९ मधील आदेशात दिले आहे. त्यातील निर्देशाप्रमाणे हा परतावा पार्ट पेमेंट स्वरुपात न करता बिलातूनच परंतु पूर्ण बील या स्वरुपात हा परतावा मिळावा अशी मागणी केली आहे. ग्राहकाने जुलैं २०१० चे बील जोडले आहे. त्यात बिलाची रक्कम रु. २०,७००/– व विलंब आकार रु. ४२२.३७ दाखविला आहे. वि.प.च्या WCR प्रमाणे परताव्याची रक्कम ही रु. ३,९७,१००/– व १.३% नॉर्मेटिव्ह चार्जेस रु. ९,१४२/– चा समावेश केला आहे. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार एका बिलात परताव्याची रक्कम समायोजित करावी. मा. आयोगाच्या केस क्र. ९३/२००८ दि. १.९.२०१० प्रमाणे –

Thereafter MSEDCL should adjust the extra charges collected by MSEDCL in the energy bills of the respective consumers

नुसार ग्राहकाच्या मासिक बिलातून समायोजन करण्याचे आदेश करणे योग्य व कायदेशीर होईल. वि.प.चे म्हणणे अशा परताव्याच्या रकमेचे समायोजिन मासिक बिलाच्या ५०% घेवून आदेश होवून ती रक्कम पूर्ण समायोजन होईपर्यंत ही व्यवस्था चालू राहावी ही मागणी फेटाळणेत येत आहे. म्हणून मुद्दा क्र. ३ चे उत्तर ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे परताव्याची रक्कम पार्ट पेमेंट न करता पूर्ण रकमेचा परतावा बिलातून पूर्ण बील या स्वरुपात द्यावा ही मागणी फेटाळणेत येत आहे.

वितरण कंपनीने प्रामुख्याने आपल्या मुख्य कार्यालयाचे परिपत्रक क्र. ३९२०६ दि. २१.१२.२००९ चा आधार घेतला आहे. या उलट, ग्राहक प्रतिनिधींनी मा. आयोगाचे अलिकडचे दि. १.९.२०१० चे केस क्र. ९३/२००८ च्या आदेशाचा आधार घेतला आहे. यामध्ये Refund of money towards D.D.F. should be made through energy bills असा उल्लेख आहे.

ग्राहकाने परताव्याच्या रकमेवर कलम ६२(६) विद्युत कायदा २००३ नुसार व्याजाची मागणी केली आहे. वि.प.ने ग्राहकाला चुकीच्या पध्दतीने डी.डी.एफ. योजना राबवून खर्च करावयास लावून वीज जोडणी दिली आहे. मा. आयोगाच्या केस क्र. ८२/२००६ मधील दि. ८.९.२००६ चे आदेशानुसार वि.प.ने ग्राहकांकडून शेड्यूल ऑफ चार्जेस व्यतिरिक्त वसूल केलेल्या रकमांच्या परताव्याचे आदेश दिले आहेत. केस क्र. ५६/२००८ मधील आदेशानुसार मा.आयोगाने अशा रकमा व्याजासह परत करण्याचे आदेश दिले आहेत. मा. आयोगाने वि.प.च्या मागणीनुसार वार्षिक टॅरिफमध्ये ३ महिन्यानंतर १२% व्याज आकारणी करण्याची परवानगी / अधिकार दिलेले आहेत. या ठिकाणी वि.प. ग्राहकाची रक्कम चुकीच्या पध्दतीने डी.डी.एफ. योजनेमध्ये जमा करुन घेवून वीज जोडणी दिली असून सदरच्या रकमा ग्राहकाकडून भरुन घेतल्या आहेत व त्या मा. आयोगाने आदेश देवूनही ग्राहक मंचाकडे येईपर्यंत परत दिल्या नाहीत. त्यामुळे टॅरिफ ऑर्डर मधील तरतुदीनुसार ग्राहकास वि.प.ने परताव्याच्या रकमेवर १२% व्याज देण्याचे आदेश करणे योग्य व कायदेशीर होईल.

वरील विवेचनावरुन ग्राहकांच्या तक्रारींतील परताव्याच्या रकमा बाबतची मागणी मंजूर करण्यात येत आहे. परताव्याची रक्कम दोन बिलींग सायकलमध्ये समायोजित करुन उर्वरित रक्कम रोखीने द्यावी ही मागणी फेटाळण्यात येत आहे. तक्रार क्र. ३०७/२०१० मधील मागणी पहातां, परताव्याची रक्कम एकच पूर्ण बील या स्वरुपात मिळावी ही मागणी फेटाळण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश –

# आदेश

१) या तिन्ही तक्रारी मंजूर करण्यात येत आहेत.

२) तक्रार क्र. २७०/२०१० मधील ग्राहक यांना वि.प.ने परताव्याची रक्कम रु.२,४८,८९७.३० व त्यांना दि. १.२.२००८ रोजी विद्युत पुरवठा सुरु झालेल्या दिनांकापासून सदर रकमेचे बिलातून समायोजन सुरु होईपर्यंतच्या कालावधीसाठी १२% व्याज द्यावे. परतावा रक्कम व व्याजाच्या रकमेचे समायोजन वीज देयकातून सदर रकमा पूर्णपणे फिटेपर्यंत करण्यात यावे.

३) तक्रार क्र. २७१/२०१० मधील ग्राहक यांना वि.प.ने परताव्याची रक्कम रु. १,६१,६००/– व त्यांना दि. ८.८.२००८ रोजी विद्युत पुरवठा सुरु झालेल्या दिनांकापासून सदर रकमेचे बिलातून समायोजन सुरु होईपर्यंतच्या कालावधीसाठी १२% व्याज द्यावे. परतावा रक्कम व व्याजाच्या रकमेचे समायोजन वीज देयकातून सदर रकमा पूर्णपणे फिटेपर्यंत करण्यात यावे.

३) तक्रार क्र. ३०७/२०१० मधील ग्राहक यांना वि.प.ने परताव्याची रक्कम रु. ३,९७,१००/– व त्यांना दि. ५.४.२००८ रोजी विद्युत पुरवठा सुरु झालेल्या दिनांकापासून सदर रकमेचे बिलातून समायोजन सुरु होईपर्यंतच्या कालावधीसाठी १२% व्याज द्यावे. परतावा रक्कम व व्याजाच्या रकमेचे समायोजन वीज देयकातून सदर रकमा पूर्णपणे फिटेपर्यंत करण्यात यावे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

**<u>ग्राहक तक्रार क्र. २७०/२०१०, २७१/२०१०, ३०७/२०१०</u>**

मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या आदेशाशी सहमत नसल्यामुळे श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव स्वतंत्र मत नोंदवित आहे.

**<u>(अ) ग्राहक तक्रार क्र. २७१/२०१० (श्री. आनंदराव सिदू डबाणे, रा. कासेगांव, जि. सांगली )</u>**

आदेशातील क्र. (३) नुसार ग्राहकास रु. १,६१,६००/- या रकमेवर १२% व्याज जोडणी दिल्याच्या तारखेपासून म्हणजे दि. ८.८.२००८ पासून बिलातून परतावा सुरु होईपर्यंतच्या कालावधीसाठी वितरण कंपनीने द्यावे यास माझी हरकत आहे.
कारणे -

१) सदरील ग्राहकास परताव्याची रक्कम ही वितरण कंपनीचे परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ नुसार दिलेली आहे. औद्योगिक कनेक्शन हे नॉन डी.डी.एफ. या सदराखाली समजून परतावा मंजूर करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे आदेशातील क्र.३ नुसार वितरण कंपनीने ग्राहकास रु. १,६१,६००/- ही परताव्याची रक्कम त्यांच्या वीज बीलातून समायोजित करुन द्यावी.

सदर परतावा हा परिपत्रक दि. २०.५.२००८ नुसार मान्य केला असून तो दि. २०.५.२००८ नंतर देणेत येणा-या ( prospective ) वीज कनेक्शनसाठी लागू आहे.

(२) परिपत्रकाच्या तरतुदीनुसार खर्चावरील व्याज देता येणार नाही. व्याज देण्याबाबतची रक्कम व त्याचा कालावधी ठरविण्यास निश्चित आधार नाही.

सदर ग्राहकास विद्युत पुरवठा दि. ८.८.२००८ रोजी देण्यात आला. परिपत्रकाच्या तरतुदीनुसार ग्राहकास येणा-या प्रथम बिलापासून परतावा देणे योग्य होईल. म्हणजे औद्योगिक वापरासाठी मासिक बिलींग पध्दतीप्रमाणे परतावा चालू होणे आवश्यक होते, परंतु तसे झाले नाही. म्हणून वीज जोडणी नंतरच्या प्रत्येक बिलींग सायकल मधील वीज बिलाची ५०% रक्कम परताव्याच्या पहिल्या बिलातून एकदम समायोजित करावी, त्यासाठी व्याज व विलंब आकारणी करु नये. जर ग्राहकाने बीले भरली असल्यास परतावा सुरु होण्यापूर्वीच्या कालावधीसाठी भरलेल्या बिलाच्या ५०% रकमेवर १२% व्याज द्यावे. ५०% रकमेच्या परताव्याबाबतचे वितरण कंपनीचे परिपत्रक क्र. ३९२०६ दि. २१.१२.२००९ लागू राहील जे परिपत्रक क्र.२२१९७ दि. २०.५.२००८ वर आधारीत आहे.

**<u>(ब) ग्राहक तक्रार क्र. २७०/२०१० व ३०७/२०१०</u>**

सदरील ग्राहक तक्रार क्र. २७०/२०१० मध्ये मे. धन आयुर्वेद ॲग्रो ॲग्रीकल्चरल्स मधील वीज जोडणी ही दि. १.२.२००८ व ग्राहक तक्रार क्र. ३०७/२०१० मे. सुर्या बायो फ्युएल मधील वीज जोडणी दि. ५.४.२००८ रोजी देण्यात आली आहे. त्यामुळे परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ प्रमाणे नॉन-डी.डी.एफ. योजनेतून ग्राहकास बिलातून परतावा देता येणार नाही.

खालील मुद्दे विचारांत घेणे आवश्यक आहे.

1) MERC issued Schedule of Charges Order in case No. 70 of 2005 on date 8th Sept. 2006.

2) MSEDCL aggrieved by MERC' s Orders totally disallowing to levy of ServiceLine Charges (SLC), preferred an Appeal under Section 111 of the E.A. 2003 before the " Tribunal being Appeal No. 22/2007.

3) The Tribunal by its Order dtd. 14.5.2007 dismissed the Appeal and confirmed the Order of MERC.

4) MSEDCL filed an Civil Appeal No. 20340 of 2007 in Hon'ble Supreme Court against the legality, validity and properiety of the final judgement and order dtd. 14.5.2007 passd by the Appellate Tribunal of Electricity (the Tribunal ).

5) The civil appeal is filed on following grounds :

i) because the orders of the Tribunal and MERC rendered the provision of Section 46 of the Act as well as Regulations 3.3 of the Suply Code which allows the Appellant (MSEDCL) to recover the amounts reasonably incurred by it for providing any electric line or electric plant for supplying electicity, redundant and otiose.

ii) Because the Orders of Tribunal and MERC are contrary to Section 46 of the Act and Regulation 3.3 of the Supply Code.

iii) MSEDCL was recovering SLC from consumers since from 1991. After supply Code came into force in 2005, the MSEDCL submitted Schedule of Charges including proposed SLC to MERC for approval. On all ocassions , the amount reovered as SLC was always reflected as consumer's contribution in the Balance Sheet of the MSEDCL at the stage of ARR.

iv) Hon'ble Supreme Court issued Stay Order on 31.8.2007, the matter of refund till the matter comes up for hearing on 14.9.2007 Hon'ble Supreme Court continued the Stay untill further orders. Till this date, the stay is in existance.

6) Based on the Commission's order dtd. 16th February 2008, MSEDCL issued a Circular No. 22197 dated 20th May 2008 specifying " Guidelines for releasing new connections and augmentation". These guidelines were issued to follow uniform practice throughout the State for deciding applicability of Dedicated Distribution Facility (DDF) and to avoid hardship to prospective consumers and to remove the difficulties in releasing of new connections.

The guidelines issued were subject to the final decision of the proceedings pending before the Hon. Supreme Court.

7) MSEDCL's Circular dated 20th May 2008 has a provision of refunding the infrastructure expenses incurred by the prospective Non-DDF

consumers for getting early connection through energy bill.



8) MERC in its order dated 1st Sept. 2010 in (caseNo. 93/2008) given directive 19 (iii) on page No. 12 that MSEDCL either has to scrutinize details of all the consumers released during the period of 9th Sept. 2006 to 20th May 2008 for charges levied other than approved Schedule of Chargs or publicly appel either through news papers or electricity bills asking the consumers to contact MSEDCL if such charges are levied on them during above period. Thereafter, MSEDCL should adjust the extra charges collected by MSEDCL in the eneregy bills of respective consumers. If any consumer has any grievance regarding excess charges levied by MSEDCL and its refund, they may file the same before concerned CGRF established by MSEDCL under the provision of Section 42 (5) of E.A. 2003 read with the Maharashtra Electricity Regulatory Commission (Consumer Grievance Redressal Forum & Electricity Ombur(sman ) Regulations 2006.

The directives of refund of excess recovered charges will not be applicable to the charges of which refund is stayed by Hon'ble Supreme Court in Civil Appeal 20340 of 2007.

वरील मुद्दे लक्षात घेता ग्राहकास वीज पुरवठा करण्यासाठी येणारा खर्च (SLC - Service Line Charges ) परतावा देण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. दि. २०.५.२००८ पर्यंत वितरण कंपनीने सर्व्हीस लाईन चार्जेस हे SLC, ORC, ORC (P), CSS, DS, DDF अशा वेगवेगळ्या सदराखाली रक्कम वसूल केल्याचे किंवा रक्कम ग्राहकाने खर्च केल्याचे मंचाकडे दाखल झालेल्या तक्रारीवरुन दिसते. या संदर्भात मा. विद्युत नियामक आयोगाचा दि. १८.२.२०११ चा केस क्र. १००/२०१० व केस क्र. १०१/२०१० आदेश विचारांत घेणे आवश्यक वाटते.

परताव्याबाबतच्या वरील दोन तक्रारी न्यायप्रविष्ट असल्यामुळे सद्यस्थितीत परताव्याबाबत आदेश देणे योग्य होणार नाही असे माझे मत आहे.

( जी. बी. पानकर )
सदस्य सचिव
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर